महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
( महाराष्ट्र शासनाचा उपक्रम )
सीआयएन क्र.यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५

मुख्य अभियंता (स्थापत्य), सांघिक कार्यालय, तळमजला,
प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.
दुरध्वनी क्र. (वै) २६४७३७६२ (का) २६४७२१३१
Website: www.mahadiscom.in
Email: cecbandra@mahadiscom.in
srmgrcivil@mahadiscom.in ; srmgrcivil@gmail.com.

मुअ(स्था)/स्था.सां.का/वांद्रे/मा.सं/**२३०** दि. **१६.०२.२०१९**

## परिपत्रक

**विषय**: सांघिक कार्यालय, मुंबई अखत्यारित कंपनी सदनिका मिळण्याकरीता Employee Portal द्वारे अर्ज करण्याबाबत

महावितरण कंपनीमध्ये कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्या मानव संसाधन व संबंधीत कामाच्या सोयीकरीता Employee Portal सुरु करण्यात आले आहे. यामध्ये अधिकारी/कर्मचारी यांना कंपनी सदनिका (Staff Quarters) मिळणेबाबतचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने Employee Portal द्वारे सादर करण्याबाबत व त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही ऑनलाईन पद्धतीने सुरु करण्याबाबत मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी निर्देशीत केले होते.

त्या अनुषंगाने, **दि. १८ फेब्रुवारी, २०१९ पासून, सांघिक कार्यालय, मुंबई येथे कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांना मुंबई येथील कंपनी सदनिका मिळण्याकरीता Employee Portal द्वारे अर्ज सादर करणे बंधनकारक करण्यात येत आहे**. दि. १८ फेब्रुवारी, २०१९ पासून कंपनी सदनिका मिळणेबाबचे कोणत्याही स्वरुपातील लेखी/विहीत नमुन्यातील अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

तसेच ज्या अधिकारी/ कर्मचारी यांनी दि. १८ फेब्रुवारी, २०१९ पुर्वी कंपनी सदनिका मिळणेबाबत अर्ज मुख्य अभियंता (स्था), स्थापत्य सांघिक कार्यालय यांचेकडे सादर केले आहेत, त्या अधिकारी/ कर्मचारी यांनी पुन्हा Employee Portal द्वारे अर्ज करु नयेत.

**Employee Portal वर कंपनी सदनिका मिळणेबाबत अर्ज खालील प्रमाणे उपलब्ध आहे.**

**Login ⟶ Application ⟶ Quarter Application**

उपरोक्त प्रमाणे कार्यवाहीनंतर अर्ज प्रथम **Save** करावे व नंतर **Submit** करावेत. Employee Portal द्वारे अर्ज **Submit** केल्याशिवाय प्रतिक्षायादीवर उपलब्ध होणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक सांघिक कार्यालय, मुंबई मधील अधिकारी/कर्मचारी यांच्याकरीता लागु आहे.

(रा. र. जनबंधु) 16/2 Camp Ngp.
मुख्य अभियंता (स्था)

**प्रत सविनय सादर:**
१. संचालक (संचलन)/(प्रकल्प)/(वित्त)/(वाणिज्य), महावितरण, सांघिक कार्यालय, मुंबई
२. कार्यकारी संचालक (मा.सं.)/ (मा.तं.), महावितरण, सांघिक कार्यालय, मुंबई

**प्रत रवाना:**
मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांचे विशेष कार्य अधिकारी